दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

# रायगड नगरी

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

• वर्ष १७ वे • अंक २० • MAHMAR/2006/17212 • रायगड • गुरुवार दि.२१ एप्रिल २०२२ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## महाराष्ट्रातील तिरुमला देवस्थानसाठी १० एकर जागा अर्पण

**दै.रायगड नगरी । मुंबई**

तिरुपती बालाजीच्या भक्तगणांसाठी आनंदाची बातमी आहे. ज्या भक्तांना आंध्र प्रदेश इथे जाऊन बालाजीचे दर्शन घेता येत नाही त्यांच्यासाठी नवी मुंबईत भव्य दिव्य असं तिरुपती बालाजी मंदिर उभारण्यात येणार आहे. नवी मुंबईतील आंतरराष्ट्रीय विमानतळापासून हाकेच्या आंतरावर उलवे इथे दहा एकर जागेवर हे मंदिर साकारण्यात येणार आहे. त्यासाठी, १० एकर जागेस मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे.

तिरुपती देवस्थानकडून महाराष्ट्र सरकारकडे मंदिर बांधण्यासाठी जागा मिळावी, अशी मागणी करण्यात आली होती. यावर सकारात्मक भूमिका घेत सिडकोच्या संचालक मंडळाच्या बैठकीत हा प्रस्ताव मंजूर करुन तो अंतिम मंजुरीसाठी राज्य सरकारकडे पाठवा, असे निर्देश नगरविकास खात्याचे मंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह पर्यटन मंत्री आदित्य ठाकरे यांनी अधिकाऱ्यांना दिले होते. त्यानंतर, मुख्यमंत्र्यांशी चर्चा झाल्यानंतर अखेर या नवी मुंबईत प्रति तिरुपती बालाजी मंदिरासाठी १० एकर जागा अर्पण करण्यात आली आहे.

# महिला सहाय्यक पोलिस निरीक्षक व पोलीस नाईक लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळ्यात

**दै.रायगड नगरी । कर्जत**

**कर्जत पोलिस ठाण्याच्या महिला सहाय्यक पोलिस निरीक्षक सुनिता शंकर अथने व पोलीस नाईक सचिन पमू नरुटे यांना ५० हजाराची लाच स्वीकारताना नवी मुंबई येथील लाललूचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात पकडले आहे.**

याबाबतची सविस्तर हकीकत अशी तक्रारदार याचे सासू-सासरे, मेव्हणे व इतर यांच्याविरुद्ध कर्जत पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर नंबर १०९/२०२२ अन्वये गुन्हा दाखल आहे, सदर गुन्ह्यातील तक्रारदार यांच्या तीन मेहुण्यांना




अटक करण्यात आली असून त्यांना न्यायालयीन कोठडी आदेश करण्यात आले आहे, कर्जत पोलीस ठाण्याच्या लोकसेविका महिला सहाय्यक पोलिस निरीक्षक सुनिता अथने यांनी तक्रार यांचे तीन मेहुणे यांना जामीन मिळण्यासाठी मदत करण्याकरिता तसेच गुन्ह्यातील इतर पाहिजे असलेले १२ जणांना गुन्ह्यात अटक न करता नोटीस देवून सोडण्यासाठी तक्रारदार यांच्याकडे १ लाख रुपये रकमेची मागणी करून त्या पैकी ५० हजार रकमेची लाच ची मागणी करून त्यापैकी १० हजार रुपये रकमेची लाच स्वीकारली असल्याबाबतची तक्रार नवी मुंबई लाचलुचपत प्रतिबंधक विभागात १९ एप्रिल २०२२ रोजी दिली होती.

१९ एप्रिल २०२२ रोजी तक्रारदार यांनी कर्जत पोलीस ठाण्याच्या महिला सहाय्यक पोलिस निरीक्षक सुनिता अथने यांनी तक्रारदार यांच्या कडे १ लाख रुपये रकमेची मागणी करुन तडजोडी अंति ५० हजार रुपयांची रकमेची लाच ची मागणी केल्याचे निष्पन्न झाले, त्यानुसार आज दि. २० एप्रिल २०२२ रोजी महिला सहाय्यक पोलिस निरीक्षक सुनिता अथने व पोलीस शिपाई सचिन नरुटे यांनी तक्रारदार यांच्याकडून ५० हजार रुपये रकमेची लाच कर्जत पोलीस ठाणे येथे स्वीकारल्या बद्दल त्यांना नवी मुंबई येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडले आहे.

## बागमांडले येथील पुलाचे काम नित्कृष्ट दर्जाचे

### सार्वजनिक बांधकाम खात्याचे दुर्लक्ष

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

श्रीवर्धन तालुक्यातील बागमांडले गावाजवळ हरिहरेश्वर बागमांडले मार्गावरती एका फुलाचे काम सुरू आहे. मात्र हे सुरू असलेले काम अत्यंत निकृष्ट पद्धतीने सुरू असल्याचे पाहायला मिळत आहे. सदर पूल हा जुना झालेला असल्याने तो पूल पाडून त्या ठिकाणी नवीन पुलाचे बांधकाम सुरू करण्यात आलेले आहे. मात्र ठेकेदाराने जुने असलेले पिलर न तोडता सदर पिलरना बाहेरून स्टील लावण्यात आलेले आहे व जुन्या पिलरला थोडासेच सिमेंट कॉन्क्रीट भरून जुने असलेले पिलर नवीन बांधल्याचे दाखवले जाणार आहे.

वास्तविक ज्या वेळेला सार्वजनिक बांधकाम विभाग फुलाचे नवीन काम सुरू करते त्यावेळेला जुना असलेला संपूर्ण पूल पाडून टाकणे गरजेचे असते. परंतु बांधकाम विभागाचे अभियंता आणि ठेकेदार यांच्या संगनमतामुळे सदर पुलाचे काम निकृष्ट पद्धतीने सुरू असल्याचा आरोप बागमांडले गावातील ग्रामस्थांनी केला आहे. सदर पुलाचे काम हे पावसाळ्यावर अगोदर पूर्ण होणे गरजेचे आहे.

अन्यथा हा मार्ग बंद पडेल की काय अशी भीती ग्रामस्थांमधून व्यक्त केली जात आहे. तरी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वरिष्ठ अभियंत्यांनी सदर पुलाच्या कामाची तातडीने पाहणी करावी व संबंधित ठेकेदाराला पुलाचे बांधकाम चांगल्या पद्धतीने करणे बाबत समज द्यावी. तसेच पावसाळा सुरु होण्या अगोदर हा पूल वाहतुकीसाठी खुला करण्यात यावा अशी मागणी बागमांडले ग्रामस्थांमधून करण्यात येत आहे.

### दारूची नशा भागवण्यासाठी रेल्वेच्या सिग्नल केबलची चोरी

## तीन आरोपींना अटक ; दोघांचा शोध

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल हर्बर रेल्वे मार्गावरील सिग्नल यंत्रणेला कंट्रोल करणाऱ्या, सिग्नल लोकेशन बॉक्स मधील केबल ची वायर तोडून त्याची भंगारात विक्री करणाऱ्या आरोपीच्या मुसक्या आवळण्यात पनवेल रेल्वे सुरक्षा बला यश आले आहे. या प्रकरणी तीन आरोपींना अटक करण्यात आली आहे. या तीन आरोपींनी अन्य दोन मित्राच्या मदतीने पनवेल रेल्वे स्थानक परिसरातील पोल नंबर ४८ जवळील सिग्नल लोकेशन बॉक्स मधील केबल चोरली होती. या केबल चोरीमुळे पनवेल हर्बर रेल्वे मार्ग ४ तास ठप्प झाला होता.

सुनील लोंगरे, अनिल लोंगरे, आकाश कोळी, रईश सय्यद, सईद अब्दुल सलाम असे पाच आरोप-ीची नावे आहेत. या पाच आरोपीनी संगनमतांनी १३ एप्रिल रोजी पनवेल रेल्वे स्थानक परिसरातील पोल नंबर ४८ जवळील सिग्नल यंत्रणेला कंट्रोल करणाऱ्या लोकेशन बॉक्स मधील केबल ची चोरी करून पोबारा केला होता. या केबल चोरीमुळे १३ एप्रिल रोजी



पहाटे एक ही लोकल सी एस टी च्या दिशेने धावू शकली नाही त्या मुळे, पनवेल, खांदेश्वर, मानसरोवर, खारघर रेल्वे स्थानकात रेल्वे प्रवाशांची तोबा गर्दी झाली होती. तब्बल चार तास रेल्वे सेवा ठप्प झाली होती. या चोरीच्या प्रकारा नंतर, रेल्वे सुरक्षा दलाच्या जवानांनी आरोपीचा शोध घेण्यास सुरवात केली, त्या वेळी हे चोरटे रेल्वे स्थानकाच्या शेजारी असलेल्या झोपडपट्टी परिसरातील आहेत. या अधिक तपास केल्या नंतर दोन आरोपींना या जवानांनी पनवेल मधून अटक केली. या आरोपींना अटक केल्या नंतर अन्य साथीदाराचा शोध घेण्यास मदत मिळाली, त्या पैकी तीन आरोपी अटक असून दोन आरोपीचा शोध पोलीस घेत आहे. या तील दोन आरोपी हे सराईत असून, या पूर्वी देखील रेल्वे परिसरातील केबल आणि अन्य चोरी च्या प्रकारात त्यांना अटक करण्यात आली होती. तर अन्य आरोपी

.../२

### संक्षिप्त...

#### गुणरत्न सदावर्ते आता कोल्हापूर पोलिसांच्या ताब्यात

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांच्या निवासस्थानावर हल्लाप्रकरणानंतर गुणरत्न सदावर्ते विरोधात सुरु झालेले शुक्लकाष्ट काही संपण्याचे नाव घेत नाहीय. सातारा पोलिसांनी अटक केल्यानंतर सध्या न्यायालयीन कोठडीत असलेल्या सदावर्तेंना आता कोल्हापूर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. अँड. गुणरत्न सदावर्ते याच्या अटकेसाठी कोल्हापुरातील शाहुपुरी पोलिसांचे विशेष पथक मंगळवारी सकाळी मुंबईत दाखल झाले होते. तर त्यांना अटकपूर्व जामिन मिळावा यासाठी कोल्हापुरातील न्यायालयात अर्ज दाखल करण्यात आला होता. परंतू याची सुनावणी लांबणीवर पडल्याने आणि त्यातच सातारा पोलिसांनी केलेल्या अटकेनंतर सातारा न्यायालयाकडून जामीन मिळाल्याने कोल्हापूर पोलिसांचा मार्ग मोकळा झाला होता. सकल मराठा क्रांती मोर्चाचे कोल्हापुरातील समन्वयक दिलीप पाटील यांनी अँड. गुणरत्न सदावर्ते याच्याविरुद्ध शाहूपुरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला होता.

**पाहिजेत**

मराठी, इंग्रजी टायपिंगचे तसेच इंटरनेट ज्ञान असलेले मुले-मुली पाहिजेत.

: संपर्क :
९७६९०११६६७

## पनवेल महापालिका क्षेत्रात मान्सूनपूर्व कामांना सुरुवात; परेश ठाकूर यांनी घेतला आढावा



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महापालिका क्षेत्रात मान्सूनपूर्व कामांना सुरुवात झाली आहे. त्या पार्श्वभूमीवर सभागृह नेते परेश ठाकूर यांनी महापालिका हद्दीतील तळोजा मजकुर येथे भेट देऊन नाले आणि रस्त्यांच्या कामांची पाहणी केली तसेच अधिकार्यांना आवश्यक त्या सूचना केल्या. पावसाळ्याच्या अगोदर ही सर्व कामे पूर्ण होतील, असा विश्वास त्यांनी या वेळी व्यक्त केला.

पनवेल महापालिका हद्दीतील तळोजे मजकुर येथे असलेल्या

.../२

## राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या मागण्या मान्य न झाल्यास २ मे च्या लढाईसाठी सज्ज रहा : मुख्य संघटक

**दै.रायगड नगरी । उरण**

महाराष्ट्र राज्य नगरपंचायत, नगरपरिषद कर्मचारी व संवर्ग कर्मचारी संघर्ष समितीचे निमंत्रक डॉ डी. एल कराड, रामगोपाल मिश्रा, डी. पी शिंदे, ॲड सुरेश ठाकूर आणि अँड सुनिल वाळूजकर यांच्या नेतृत्वाखाली संघर्ष समितीचे राज्याचे मुख्य संघटक संतोष पवार यांनी काल २० एप्रिल २०२२ रोजी नगरविकास विभागाचे प्रधान सचिव महेश पाठक यांची मुंबई येथील मंत्रालयात प्रत्यक्ष भेट घेऊन राज्यातील सर्व नगरपरिषदा आणि नगरपंचायती मधील कामगार कर्मचारी यांच्या विविध न्याय्य मागण्यांसाठी निवेदन सादर केले. कर्मचाऱ्यांच्या मागण्या मान्य न झाल्यास २ मे च्या लढाईसाठी सज्ज रहा असे आवाहन महाराष्ट्र राज्य नगरपंचायत, नगरपरिषद व संवर्ग कर्मचारी समितीचे मुख्य संघटक संतोष पवार यांनी केले आहे.

त्याच प्रमाणे संघर्ष समितीने केलेल्या मागण्या मान्य करुन सन्मान पूर्वक योग्य तोडगा निघण्याच्या दृष्टीने मंत्रालयीन स्तरावर उच्चस्तरीय बैठकीचे आयोजन करण्यात यावे अन्यथा कोणत्याही परिस्थितीत दि. २ मे २०२२ पासून महाराष्ट्रातील सर्व नगरपालिका कर्मचारी बेमुदत काम बंद आंदोलन करण्याच्या तयारीत असल्याबाबत चर्चा केली. त्यावेळी नगरविकास विभागाचे प्रधान सचिव महेश पाठक यांनी लवकरात लवकर आपल्या मागण्या बाबत बैठक आयोजन करण्यात येईल असे आश्वासन देऊन ज्यादिवशी आयुक्त तथा संचालक नगर परिषद प्रशासन संचालनालय वरळी यांनी आपल्या संघर्ष समितीस चर्चेसाठी आज दि.२२ एप्रिल २०२२ रोजी बोलावण्यात आले आहे.

त्याच दिवशी मंत्रालयीन स्तरावर ही आपली बैठक घेण्याबाबत सकारात्मक भूमिका घेत त्यांनी आश्वासन दिले आहे. त्यामुळे आपल्या मागण्या मान्य न झाल्यास कोणत्याही परिस्थितीत आ-पले २ मे २०२२ पासूनचे बेमुदत काम बंद आंदोलन होणारच आहे. त्यामुळे संघटनेचे निमंत्रक व मुख्य संघटक जो पर्यंत कोणताही निर्णय अधिकृतरित्या आपणास कळवत नाहीत

.../२

## अतिरिक्त सुरक्षाठेव विज बिलांचा ग्राहकांना झटका

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

विज वितरण कंपनीने ग्राहकांना अतिरिक्त सुरक्षा ठेव जमा (ॲडिशनल सिक्युरिटी डिपॉझिट)चा झटका दिला आहे. ऐन उन्हाळ्यात ग्राहकांना आलेल्या जादा वीज बिलांसह अतिरिक्त सुरक्षा ठेव जमा करावी लागणार आहे. मागील काही महिन्यांपासून सतत वाढ होऊन येणाऱ्या विज बिलांमुळे वीजग्राहक बेजार झाले आहेत. त्यातच या वेळी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने अतिरिक्त ठेव बिल पाठवून सामान्य ग्राहकांची आर्थिक लूट सुरू केली आहे. विज वापराचे आकार कमी मात्र बिलात स्थिर आकार, वीज शुल्क, इंधन समायोजन आकार, विविध प्रकारचे कर वसूल करून सामान्य वीज ग्राहकांकडून लुटमार सुरू आहे. ग्रामीण आणि शहरी भागात नियमित वीजपुरवठा करण्यात वीज वितरण कंपनी अपयशी ठरत असताना एप्रिल महिन्यात अतिरिक्त सुरक्षा ठेवीचा झटका ग्राहकांना दिला आहे. महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी ड्रिस्ट्रीब्युशन कंपनी लिमिटेडने १० जानेवारी २००२ च्या आदेशानुसार या ठेवीत वाढ केली आहे. विज ग्राहकांना दर माहे विज

.../२

## रणच्या कॉन्वेअर सीएसएफ वेअरहाऊसमधील प्रश्न मार्गी; तीन महिन्यांची मुदतवाढ

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पंजाब स्टेट कंटेनर वेअरहाऊसिंग कॉर्पोरेशनच्या कॉन्वेअर सीएसएफ या वेअरहाऊसमधील कामगारांना माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यामुळे न्याय मिळाला आहे. या वेअरहाऊससाठी जीएडी लॉजिस्टीकला तीन महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली आहे. त्याबद्दल कामगारांनी लोकनेते रामशेठ ठाकूर आणि जय भारतीय कामगार संघटनेचे अध्यक्ष जितेंद्र घरत यांचे आभार मानले आहेत. उरण तालुक्यातील धुतूम येथे पंजाब स्टेट कंटेनर वेअरहाऊसिंग कॉर्पोरेशनच्या कॉन्वेअर सीएसएफ वेअरहाऊस हे जानेवारी ते मार्च असे तीन महिने बंद होते. या वेअरहाऊसाठी तीन वेळा टेंडर काढण्यात आले होते, मात्र कोणीही टेंडर भरले नाही. त्यामुळे वेअरहाऊसमध्ये काम करणार्या सुमारे ३५० स्थानिक कामगारांच्या रोजगाराचा प्रश्न निर्माण झाला होता. स्थानिकांच्या कामाच्या प्रश्नासंदर्भात भारतीय



.../२

## नवनाथ नगर झोपडपट्टी येथील दोन घरे जळून खाक



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल रेल्वे स्थानक शेजारी असलेल्या नवनाथ नगर झोपडपट्टीत आज दुपारी ११ वाजण्याच्या सुमार आग लागल्याची घटना घडल्याचे समोर आले आहे.

या आगीच्या घटनेत दोन घरे जळून खाक झाली आहे आगीचे अद्याप कारण समजले नाही, सकाळी आग लागल्या नंतर पनवेल महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी पोचून ही आग आटोक्यात आणली अन्यथा नवनाथ नगर मधील सर्व झोपड्या या अग्नीच्या भक्ष्य स्थानी गेल्या असत्या.

# मुकी बिचारी कुणी हाका...

कोट्यवधी भारतीय कुटुंबांना रोजच्या जगण्यात जे अनुभवाला येते आहे; तेच सरकारी आकडेवारीवरून पुन्हा सिद्ध होते आहे. ते म्हणजे, महागाई वाढते आहे. रोजच ज्या आगीचा चटका बसतो आहे. ती आग पाहण्यासाठी आकड्यांच्या आरशाची नागरिकांना गरज नाही. नुकताच घाऊक महागाई निर्देशांक जाहीर झाला. तो उच्चांकी आहे. मार्चमध्ये महागाईचा दर १४.५५ टक्के आहे. घाऊक निर्देशांकापेक्षा किरकोळ महागाई निर्देशांक बराच कमी असतो. त्याची अर्थशास्त्रीय व संख्याशास्त्रीय कारणे आहेत. सध्या किरकोळ महागाई निर्देशांक सातच्या घरात आहे. दिशाभूल करण्यासाठी नेहमी हा आकडा समोर केला जातो; मात्र सरकारने कशीही आकडेवारी फिरवली, तरी रोज बाजारात जाणारा ग्राहक इंधन, तेलबिया, डाळी, कडधान्ये, भाज्या यांच्या भाववाढीने होरपळून आणि सोलवटून निघतो आहे. करोनाकाळात झालेले सवलतीचे धान्यवाटप यापुढे चालू राहणे कठीण आहे; शिवाय ज्याचे वाटप होते, तेवढेच संसाराला लागत नाही. इतरही बरेच लागते. या संकटाबाबत केंद्र सरकारने युक्रेन युद्धाकडे किंवा जागतिक बाजारातील क्रूड तेलाच्या भावाकडे बोट दाखविणे ताबडतोब बंद केले पाहिजे. जागतिक परिस्थितीची झळ नागरिकांना कमीत कमी कशी बसेल, हे पाहण्यासाठी तर सरकार आहे ना! आता केंद्र सरकारने त्वरित इंधन तेलांवरचा केंद्रीय कर आणखी कमी करायला हवा. केंद्र सरकारने तसे केले, तरच त्या कृतीचा दबाव राज्य सरकारांवर येऊन तेही काही सवलत देतील. इंधनाचा दर कमी होणे, हीच सर्व प्रकारची महागाई रोखण्याची गुरुकिल्ली आहे. भारताची देशांतर्गत बाजारपेठ ही कमालीची लवचिक आणि प्रवाही झाली आहे. शेकडो किलोमीटर प्रवास करून आलेली फळे किंवा धान्ये ग्राहक विकत घेतो. इतर शेकडो जीवनावश्यक वस्तू, चिजा भारतभर इकडून तिकडे प्रत्यही जातात. त्यांची वाहतूक सुलभ व स्वस्त ठेवणे, हे सरकारचे कर्तव्य आहे. ही वाहतूक सुलभ झाली नाही, की काळ्या बाजाराला ऊत येतो आणि सरकारी आकडेवारीत न दिसणारी छुपी महागाई ग्राहकांचा प्राण कंठाशी आणते. डाळींबाबत हे अनेकदा घडते. यावर सरकारचे काहीही नियंत्रण नाही. सूर्यफूल, सोयाबीन, शेंगदाणा आणि पाम ही चार प्रमुख खाद्यतेले युक्रेन युद्ध सुरू झाल्यापासून विजेच्या वेगाने महाग होत आहेत. डाळींप्रमाणेच तेलेही एकमेकांना महाग करीत जातात. इंधन हे जसे सगळ्यांच वस्तू महाग करते; तसे खाद्यतेल हे सर्व खाद्यपदार्थ महाग करते. महिन्याकाठी केवळ काही हजार रुपये कमावणाऱ्या निम्नमध्यम वर्गाने आता नेमक्या कोणत्या गरजा आणखी कमी कराव्यात, हे तरी सरकारने सांगावे. फळभाज्या किंवा वेलवर्गीय गवार, घेवडा, वालपापडी अशा भाज्यांकडे तर मंडईत बघूही नये, अशी स्थिती येते आहे. मग रोज काय खायचे? रिझर्व्ह बँक व्याजदरांना हात न लावता कर्जे व ठेवी यांच्यावरील व्याजदर कायम ठेवते, तेव्हा नेहमी अल्प व्याजदरासाठी पाश्चात्य देशांचा हवाला दिला जातो. असे कमी व्याजदर असणाऱ्या सर्व विकसित देशांमध्ये गरीब किंवा अल्पउत्पन्न गटांतील; तसेच ज्येष्ठ नागरिकांसाठी कल्याणकारी योजना असतात, निवृत्तिवेतन असते. त्यांचे जगणे केवळ व्याजावर अवलंबून नसते. भारतात निव्वळ व्याजावर जगणारे काही कोटी वृद्ध आहेत. त्यांचे जिणे खरे तर उदारीकरण सुरू झाल्यापासूनच क्रमाक्रमाने कठीण होत गेले आहे. आता तर जन्मभराची पुंजी औषधांपुरतेही व्याज देत नाही, अशी अवस्था आली आहे. दुसरीकडे, गृहकर्ज, वाहन कर्ज आणि सर्वसाधारण कर्जे महाग होणार आहेत. भारतातील बँकिंग इतके ढिसाळ आणि अकार्यक्षम आहे, की दिल्या जाणाऱ्या कर्जाच्या व्याजापेक्षा केवळ एक ते दीड टक्का कमी इतके व्याज ठेवीदारांना देता यावे, ही महत्त्वाकांक्षाच भारतीय बँकिंग क्षेत्राकडे नाही. त्यामुळे, कर्जे महाग द्यायची आणि ठेवीदारांना कमीत कमी व्याजात फुटवायचे, असा हा दुहेरी छळ आहे. अर्थातच, यात रिझर्व्ह बँकेची भूमिका महत्त्वाची आहे. रिझर्व्ह बँकेनेही चलनवाढीचा बागुलबुवा दाखवून मुदत ठेवींवरील व्याज न वाढविण्याचा हट्ट आता सोडावा. साठी ओलांडलेले किती भारतीय शेअर बाजारात शिरून, धोका पत्करून अधिक नफ्यासाठी गुंतवणूक करीत असतील? तेव्हा त्यांना तिकडे नेण्यासाठी पोस्टात किंवा बँकेत त्यांची कोंडी करणे, हे क्रूरपणाचे आहे. केंद्र सरकारने आता करसंकलनाच्या विक्रमाचे आकडे तोंडावर फेकण्यापेक्षा, सर्वसामान्य नागरिकांना कसा दिलासा देता येईल, यासाठी पुढे यावे. प्रसंगी 'जीएसटी'ची कररचना बदलावी. इंधनावरील कर तातडीने कमी करावेत. किराणा, भाजी व इतर बाजारपेठांमध्ये गंभीरपणे लक्ष घालावे. राज्यांची मदत घेऊन त्यात हस्तक्षेप करावा. 'मुकी बिचारी कुणी हाका...' अशी भारतीयांची अवस्था झाली आहे. त्याचे सोयरसुतक ना केंद्र सरकारला आहे; ना राज्य सरकारला.

# कोतवाल बुद्रुक येथे मंजूर झालेल्या प्रकल्पाच्या आढावा बैठकीत २७ बंधारे व १ साठवण टाकीची आ.गोगावलेंकडून मागणी

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

तालुक्यातील कोतवाल बुद्रुक येथे मंजूर झालेल्या प्रकल्पाच्या आढावा बैठकीचे आयोजन विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते आ.प्रवीण दरेकर यांच्या मागणी नुसार मृद व जलसंधारण मंत्री ना.शंकरराव गडाख यांनी केले असता या बैठकीप्रसंगी उपस्थित असलेले महाड विधानसभेचे आ.भरत गोगावले यांनी विधानसभा मतदार संघामध्ये २७ बंधारे व १ साठवण टाकी मंजूर करण्याची मागणी केली.



महाराष्ट्र शासनाच्या कक्ष अधिकारी वसुधा जाधव यांनी विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते आ.प्रवीण दरेकर यांच्या मागणी नुसार पोलादपूर तालुक्यातील कोतवाल बुद्रुक येथील मंजूर झालेल्या प्रकल्पातील समस्या सोडविण्यासंदर्भात आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आल्याची सूचना आ.दरेकर, आ.गोगावले, अप्पर आयुक्त जलसंधारण तथा मुख्य अभियंता प्रादेशिक क्षेत्र पुणे, प्रादेशिक जलसंधारण अधिकारी ठाणे, जिल्हा जलसंधारण अधिकारी ठाणे यांना पाठविली. त्यानुसार बुधवारी मृद व जलसंधारण मंत्री ना.शंकरराव गडाख यांच्या मंत्रालयाच्या विस्तारित इमारतीमधील दालनामध्ये विस्तारित कक्षात सर्व संबंधितांनी मंजूर प्रकल्पाच्या तात्काळ प्रकरणाच्या निविदा कार्यवाहीपासून आजमितीपर्यंतच्या सविस्तर टिपण्णीची माहितीसह उपस्थित राहण्यास सुचित करण्यात आले होते. यावेळी चर्चेदरम्यान महाड विधानसभा आमदार भरत गोगावले यांनी महाड विधानसभा मतदार संघातील २७ बंधारे व १ साठवण टाकी मंजूर करण्याचे मागणीपत्र ना.शंकरराव गडाख यांना दिले.

यावेळी विधानपरिषदेचे विरोधीपक्षनेते आ.प्रवीण दरेकर यांनी मंत्रीमहोदयांसोबत कोतवाल बुद्रुक येथील प्रकल्प कार्यान्वित होण्यासंदर्भात झालेल्या दिरंगाईबाबत चर्चा करून प्रकल्प मार्गी करण्यासंदर्भात महत्वाच्या निर्णयाप्रत ही आढावा बैठक नेली. विरोधी पक्ष नेते आ.प्रवीण दरेकर यांच्यासोबत पोलादपूर तालुका भाजप अध्यक्ष प्रसन्ना पालांडे, कृष्णकांत दरेकर, माजी जिप सदस्य मुरली दरेकर, अविनाश शिंदे, बबन शिंदे आदी उपस्थित होते. आ.गोगावले यांच्यासोबत महाड विधानसभा संपर्कप्रमुख सुभाष पवार तसेच तालुक्यातील इतर ग्रामस्थ आणि संबंधित अधिकारी उपस्थित होते.

# 'महेंद्र घरत' कामगारांना सन्मान मिळवून देणारा कामगार नेता

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कामगारांच्या न्याय हक्कासाठी सदैव लढणारे लढवय्ये कामगार नेते,महेंद्र घरत हे रायगड-नवीमुंबई मधील कामगारांचे आधारवड म्हणून ओळखले जातात. त्यांच्या न्यू मॅरीटाईम ॲन्ड जनरल कामगार संघटनेचा आलेख दिवसेंदिवस चढता आहे. आत्ताच ओल्ड मर्स्क मधील कामगारांचा कामगार कपात व पगारवाढीचा प्रलंबित प्रश्न त्यांच्या चाणक्ष नेतृत्वामुळे सोडविला गेला. व्यवस्थापनाचा ३५ कामगार कपातीचा डाव हाणून पाडून कामगारांना ७,३००/- रुपयांची पगारवाढ केली. १ मे पासून बंद होत असलेल्या हिंद टर्मिनल मधील ६०० कामगार हे कामगार नेते महेंद्र घरत यांच्या नेतृत्वाखाली एकत्र येऊन ताकदीने लढले व हिंद टर्मिनल व्यवस्थापनाला सर्व कामगारांना ५ कोटी रुपये कायदेशीर देणी देण्यासाठी भाग पाडले . तसेच कंपनी स्वतःहून बंद करत असल्यामुळे कामगारांना केलेल्या सेवेपोटी १५ लाख रुपये गुडविल रक्कम देण्याची मागणी महेंद्र घरत यांनी व्यवस्थापनाकडे केली.



पंजाब कॉनवेअर मधील स्वयंघोषित कामगार नेते बोंबलून सांगत आहेत की आम्ही कामगारांना न्याय दिला व कंपनी सुरु केली पण वस्तुस्थिती वेगळी आहे.

किमान वेतन न देता फक्त ५ ते ८ हजारांवर कामगारांना कामावर बोलवून त्यांना न्याय दिला बोलत असतील तर कामगारांचे दुर्दैव आहे. पंजाब कॉनवेअर मध्ये मुख्य कंत्राटदार GDL आहे व सब कॉन्ट्रॅक्टर GAD लॉजिस्टीक्स आहे.

जर पंजाब कॉनवेअर व GDL यांच्यातील करार ३१ जानेवारी २०२२ रोजी संपुष्टात आला तर कामगारांची कायदेशीर देणी त्यांना मिळालीच पाहिजेत तशी मागणी पहिल्यांदा महेंद्र घरत यांनी दोन्ही कंत्राटदारांकडे केली आहे.

कामगारनेते महेंद्र घरत हे जसे बोलतात तसे वागतात याची CFS मधील कामगारांना जाणीव आहे व कामगार नेते महेंद्र घरत यांचा कामगारांना आधार वाटत आहे त्यामुळे CFS कामगारांचा ओघ त्यांच्याकडे वाढत आहे.

# म्हसळा तालुक्यात गोधन चोरणारी टोळी सक्रिय ; गावांत आठ दिवसात अनेक गुरे चोरीला

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

म्हसळा तालुक्यातील खामगाव पंचक्रोशीसह तालुक्यातील अन्य गावांतून शेतकऱ्यांची गुरे चोरीला जात असल्याच्या घटना वाढत आहेत.काही दिवसांपूर्वी कणघर येथील नाना सावंत यांच्या दोन गाई जंगलात चरण्यासाठी गेल्या असता त्या गोठयात परत आल्याच नाहीत. पुन्हा दोन दिवसांत खामगाव मधील सुतारवाडी, ताम्हाणेशिर्के, कासारमलई या परिसरात शेतकऱ्यांचे गोधन गायब केल्याच्या घटना घडल्या. चोरीला गेलेल्या गुरांचा शोध घेऊन तपास लागत नसल्याने शेतकरी वर्ग चिंतेत आहे.

गोधन चोरीला जात असले बाबत पोलिसांनी गांभीर्याने दखल घेऊन चोरट्यांचा बंदोबस्त करावा अशी मागणी शेतकरी करीत आहेत. दोन दिवस वाट बघून व शोध घेऊन गाई परत न आल्याने त्या चोरीला गेल्या असाव्यात असा संशय वाटल्याने तशी तक्रार नाना सावंत यांनी म्हसळा पोलीस ठाण्यात केली आहे.

तक्रार दाखल करताना शिवसेना माजी तालुका प्रमुख नंदू शिर्के, सतीश शिगवण यांनी गाईगुरे चोरी करणारे लोकांच्या भावनांना हात घालुन मन दुखावत आहेत पोलिसांनी गस्त वाढवुन आणि ठिक ठिकाणचे तपासणी नाके कार्यान्वित करून गुरे चोरणाऱ्यांच्या मुसक्या आवळाव्या अशी मागणी केली आहे.

सातत्यपूर्ण होत असलेल्या पशुधन चोरीमुळे शेतकऱ्यांच्या मनात घबराट निर्माण झाली आहे. पोटच्या गोळ्या पेक्षाही जिवापाड प्रेम केलेले पशुधन चोरीला जात असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. गोधनाची चोरी करणाऱ्यांचा पोलिसांनी तातडीने शोध घेऊन त्यांचेवर कडक कारवाई करण्याची मागणी होत आहे.

# जिल्हास्तरीय नृत्य स्पर्धेत प्रथम क्रमांक उरण, पेझारी तर द्वितीय क्रमांक मुरुड

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

युवासेना आयोजित जिल्हास्तरीय नृत्यकला स्पर्धा २०२२ मधील सोलो डान्स स्पर्धेत प्रथम क्रमांक उरणचा निलेश म्हात्रे, द्वितीय क्रमांक पेझारी दिक्षा भोपी तर ग्रुप डान्स स्पर्धेत साई प्रेरणा कलामंच पेझारी यांनी प्रथम तर मुरुडच्या स्पारकर डान्स एकॅडेमीने द्वितीय क्रमांक पटकावले. सोलो डान्स अनुक्रमे पाच, तीन, दोन हजार व गृप डान्स अनुक्रमे दहा, सात, चार हजार रोख रक्कम तसेच स्मृतीचिन्ह देऊन गौरविण्यात आले.



मुरुड तालुक्यातील खारमजगांव येथे झालेल्या या स्पर्धेत जिल्ह्यातील २५ जण सोलो डान्स तर १७ ग्रुप डान्समध्ये सहभागी झाले होते. स्पर्धेचे उदघाटन रायगड जिल्हा परिषद माजी सदस्या राजश्री प्रशांत मिसाळ यांच्या हस्ते युवासेना अलिबाग विधानसभा समन्वयक रुपेश रोटकर, मुरूड तालुका शिवसेना प्रमुख ऋषिकांत डोंगरीकर, मुरुड तालुका पंचायत समितीचे माजी उपसभापती चंद्रकांत मोहिते, युवासेना मुरुड तालुकाधिकारी दिपेश वरणकर, उपतालुकाधिकारी शुभम भोईर, सुयोग भोईर, प्रसाद म्हात्रे, बावे सरपंच शरद खेडेकर, सदस्य अभिनय कोळी, सौरभ गोळे आदींच्या उपस्थितीत करण्यात आले.

सोलो डान्स स्पर्धेत सिया म्हात्रेला तृतिय क्रमांक मिळाला दोन हजार रोख रकमेसह स्मृतीचिन्ह बक्षिस देण्यात आले. तर ग्रुप डान्स स्पर्धेसाठी मजगावच्या श्री मावळा मर्दानी आखाडा ग्रुपला तिसऱ्या क्रमांकाचे रोख रक्कम चार हजार व सन्मानचिन्ह रुपेश रोटकर यांच्या हस्ते देण्यात आले. स्पर्धेत परीक्षक म्हणून राजू पाके, आदींनी काम पाहिले.

# शिस्ते येथे शाळा पूर्व तयारी मेळावा संपन्न

**दै.रायगड नगरी । शिस्ते**

श्रीवर्धन तालुक्यातील शिस्ते प्राथमिक शाळेमध्ये शाळा पूर्व तयारी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. मंगळवारी (ता. १९) आयोजित केलेल्या या मेळाव्यात पुढील शैक्षणिक वर्षातील नवीन मुलांचे स्वागत, मुलांची बौद्धिक, शारीरिक आणि इतर क्षमता तपासणी केली गेली.तसेच कोरोना काळात झालेल मुलांचं शैक्षणिक नुकसान भरून काढण्याचे विचार विनिमय झाला.

या मेळाव्याचे आयोजन गटशिक्षणाधिकारी किशोर नागे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. ढोलताशांच्या गजरात व लेझीम पथकाद्वारे विद्यार्थी व पालक यांची मिरवणूक काढण्यात आली. या मेळाव्याची सुरुवात श्री गणेश मंदिर पासून श्री गणेशाला वंदन करून झाली. यावेळी गटशिक्षणाधिकारी किशोर नागे, शिस्ते कापोली ग्रुप ग्रामपंचायतीचे सरपंच चंद्रकांत चाळके आगरी समाज



अध्यक्ष संतोष कांबळे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष योगेश धुमाळ, शिस्ते उपाध्यक्ष प्रमोद नाक्ती, गजानन चाळके, संजय पाटील,सुनिल नाक्ती तसेच ग्रामस्थ उपस्थित होते. दाखलपात्र विद्यार्थ्यांचे शाळेच्या मुख्य दरवाजा जवळ ओवाळणी करून तसेच गुलाब पुष्प व खाऊ देऊन मुलांची नाव नोंदणी करण्यात आली.

नोंदणी नंतर शारीरिक विकास, बौद्धिक विकास, सामाजिक आणि भावनात्मक विकास, भाषा विकास, गणनपूर्व तयारी आणि पालकांना मार्गदर्शन केले अश्या विविध दालनात विद्यार्थी धमाल करत, प्रत्येक दालनाचे महत्व समजून घेत विद्यार्थी व त्यांच्या माता पालकांनी या पहिल्या शाळा पूर्व तयारी मेळाव्याचा आनंद घेतला. शाळा अतिशय सुंदर सजावट केली होती त्याबद्दल गटशिक्षण अधिकारी किशोर नागे यांनी मुख्याध्यापक व शिक्षक ब्रुंद तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे अभिनंदन केले शेवटी विद्यार्थ्यांना चॉकलेटचे वाटप करून मेळाव्याचा समारोप करण्यात आला.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## तीन आरोपींना अटक ; दोघांचा शोध

हे दिवा परिसरातील रहिवासी असल्याचे इन्स्पेक्टर जशबीर राणा यांनी ही माहिती दिली.

रेल्वे सुरक्षा बलाच्या जवानांनी, अटक केलेल्या पाच आरोपीनी केलेल्या केबल ची चोरी ही केवळ दारू ची नशा भागवण्यासाठी केल्याची कबुली त्यांनी दिली आहे. या केबल ची चोरी करून त्या तून येणारे पैसे दारू पिण्यासाठी वापरत असल्याचे त्याच्या कडून सांगितले जय आहे.

## पनवेल महापालिका क्षेत्रात मान्सूनपूर्व कामांना सुरुवात; परेश ठाकूर यांनी घेतला आढावा

नाल्याला पावसाळ्यात मोठा प्रवाह असतो. त्यामुळे या नाल्याचे काम न झाल्यास नागरिकांना याचा नाहक त्रास सहन करावा लागू शकतो. त्या पार्श्वभूमीवर सभागृह नेते परेश ठाकूर यांनी या नाल्याची आणि तसेच रस्त्यांच्या कामाची अधिकाऱ्यांसह पाहणी केली व त्यांना सूचना दिल्या. या वेळी नगरसेवक हरश केणी, भाजप नेते निर्दोश केणी, दिनेश केणी, महापालिकेचे कार्यकारी अभियंता संजय कटेकर यांच्यासह पदाधिकारी आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

## राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या मागण्या मान्य न झाल्यास २ मे च्या लढाईसाठी सज्ज रहा : मुख्य संघटक

तो पर्यंत आंदोलनाची तयारी युद्ध पातळीवर चालूच ठेवणे आवश्यक असल्याचे म्हटले आहे. त्यामुळे संघर्ष समितीचे सर्व कामगार नेते अध्यक्ष व पदाधिकारी यांनी आंदोलनाची तयारी जोरात करावी असे आवाहन करण्यात आले आहे.

## अतिरिक्त सुरक्षाठेव विज बिलांचा ग्राहकांना झटका

वापरानुसार अतिरिक्त ठेवीची रक्कम ठरविण्यात आले असल्याचे समजते. माहे एप्रिलच्या उकाड्यामुळे ग्राहकांकडून एसी,फॅन आणि कूलरचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो.जादा युनिटचा वापर झाल्याने एप्रिल महिन्याचे बिलही अनेक ग्राहकांना हजारांच्या घरात आहे.त्या सोबतच अतिरिक्त ठेव बिलांचा वाटपही तालुक्यातील सर्व गावात झाला असल्याने विज ग्राहक चिंतेत आणि संभ्रमात पडला आहे.

## रणच्या कॉन्वेअर सीएसएफ वेअरहाऊसमधील प्रश्न मार्गी; तीन महिन्यांची मुदतवाढ

जनता पक्ष पुरस्कृत जय भारतीय कमागार संघटनेचे अध्यक्ष जितेंद्र घरत यांनी अनेक वेळा चर्चा केली. अखेर या कामगारांच्या प्रश्नाबाबत माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी प्रयत्न केले. त्यानुसार या वेअरहाऊससाठी जीएडी लॉजिस्टीकला तीन महिन्यांसाठी मुदतवाढ देण्यात आली असल्याने कामगारांचा कामाचा प्रश्न सुटला आहे. त्या अंतर्गत या पंजाब स्टेट कंटेनर वेअरहाऊसिंग कॉर्पोरेशनच्या कॉन्वेअर सीएसएफ वेअरहाऊसचे गेट माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते सोमवारी (दि. १८) श्रीफळ वाढवून उघण्यात आले. या वेळी जय भारतीय कामगार संघटनेचे अध्यक्ष जितेंद्र घरत, जीएडी लॉजिस्टीकचे मॅनेजिंग डारयेक्टर जमीर शेख यांच्यासह पदाधिकारी आणि कामगार उपस्थित होते.

# म्हसळयात इफ्तारपार्टी व शांतता सभेचे आयोजन

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

दिनांक ३ मे २०२२ या एकाच दिवशी मुस्लिम बांधवांची साजरी होणारीरमजान ईदआणि हिंदु बांधवांचा श्रद्धेचा साडेतीन मुहूर्तापैकी एक पवित्र दिवस अक्षय तृतीया उत्सव, सण शांततेत पार पाडले जावेत. सर्वधर्म समभाव जोपासना करित हिंदुमुस्लिम भाईचारा कायमस्वरूपी राहावा यासाठी म्हसळा तहसीलदार कार्यालय, पोलीस ठाणे आणि संयुक्त समाज म्हसळाचे वतीने गुरुवार दिनांक २१ एप्रिल २०२२ रोजी म्हसळा शहर घनसार कॉम्प्लेक्स सभागृहात सायंकाळी ६ वाजता विभागीय पोलीस अधीक्षक प्रशांत स्वामी यांचे प्रमुख उपस्थितीत पवित्र रमजान मासातील रोजा इफ्तारपार्टी आणि शांतता सभेचे आयोजन करण्यात आले आहे.

# बेकायदेशीर आठवडे बाजारांवर महानगरपालिकेसह पोलिसांनी कारवाई करण्याची मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खारघर, तळोजा परिसरात बेकायदेशीर आठवडा बाजार भरवले जात आहेत. यावर कारवाई करण्यात महापालिकेकडून दुर्लक्ष होत असून परिसरातील भाई-दादा या ठिकाणी बसणाऱ्या विक्रेत्यांकडून मोठ्या प्रमाणात वसुली करतात. आठवडा बाजारानिमित्त होणारी गर्दी, चोऱ्या तसेच बाजार उठल्यावर होणाऱ्या कचऱ्यामुळे परिसरातील नागरिक हैराण झाले असून कारवाई करण्याची मागणी होत आहे. खारघर, तळोजा परिसरात सिडकोच्या मोकळ्या भूखंडावर, तसेच मैदान, रस्त्यावर आठवडा बाजार भरवले जातात. यासाठी महापालिकेकडून कोणत्याही प्रकारची परवानगी न घेता काही तरुणांकडून वेगवेगळ्या दिवशी हा बाजार भरविला जातो. आठवडा बाजारात गोवंडी,मानखुर्द, मुंबई येथून व्यापारी माल विक्रीसाठी येतात. बाजारात कपडे, घरगुती वस्तू, भाजीपाला, खेळणी, चप्पल, शोभेच्या वस्तू, कटलरी आदी वस्तू खरेदीसाठी ग्राहकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होते. विक्रेत्याकडे विचारणा केली असता, बाजार भरविणाऱ्या दादा मंडळीला पन्नास ते शंभर रुपये द्यावे लागतात. ही मंडळी पोलिस, सिडको, पालिकेकडून होणाऱ्या कारवाईची सर्व जबाबदारी घेतात.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## सुकापूर येथे ६२ वर्षीय ईसमाने केली आत्महत्या, तिघांविरोधात गुन्हा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सुकापुर येथे ६२ वर्षीय इसमाने आत्महत्या केल्या प्रकरणी तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विजय धोंडू पवार असे मृत इसमाचे नाव आहे. सुकापूर येथे न्यू प्रेरणा सोसायटी येथे राहणारे विजय पवार यांच्या सुनबाई अर्पिता हिने ओळखीचा महिलांनी सामुहिक निर्माण केलेल्या मुस्कान ग्रुप या नावाने ग्रेटर बँक खारघर येथून तीन लाखाचे ग्रुप लोन घेतले होते. यातील काही हप्ते थकले होते. हे लोन वसूल करण्यासाठी बँकेतुन महिला आल्या होत्या. लोनचे हप्ते व लोन भरा नाहीतर तुमच्या घरातील सर्व सामान जप्त करून पोलिसांना बोलवुन तुम्हाला आत मध्ये टाकू असे धमकावल्यामुळे सुकापूर येथील ६२ वर्षीय विजय धोंडू पवार यांनी मानसिक तणावाखाली गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. याप्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात वैशाली, स्नेहल आणि ग्रेटर बॉम्बे बँकेच्या खारघर येथील संबंधित अधिकार्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## नागोठण्यातील विविध विकास कामांचा आज लोकार्पन व भुमीपुजन सोहळा

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

स्थानिक आमदारांच्या विकास कार्यक्रम अंतर्गत नागोठण्यातील विविध विकास कामांच्या लोकार्पन व भुमीपुजन सोहळ्याचे आयोजन नागोठणे ग्रामपंचायतीकडून आज गुरूवारी (दि.२१) सायंकाळी पाच वाजता राज्याचे माजी मंत्री व विद्यमान आमदार रविशेठ पाटील यांच्या हस्ते आणि शिवसेना नेते व राजिपचे माजी सदस्य किशोरभाई जैन यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले असल्याची माहिती नागोठण्याचे सरपंच डॉ. मिलिंद धात्रक यांनी दिली. या कार्यक्रमाला रोहा पंचायत समितीचे सदस्य बिलाल कुरेशी, नागोठण्याचे उपसरपंच मोहन नागोठणेकर, ग्रामविकास अधिकारी मोहन दिवकर यांच्यासह ग्रामपंचायतीचे सर्व सदस्य व ग्रामस्थ उपस्थित राहणार आहेत.

स्थानिक आमदार विकास कार्यक्रम अंतर्गत मशिदी शेजारील नाला, बँक ऑफ इंडिया समोरील पेव्हर ब्लॉक रस्ता, आंगर आळी क्रॉस ड्रेन या कामांचा लोकार्पन सोहळा तर तर डॉ. कुंटे ते शैलेंद्र देशपांडे घरापर्यंत रस्त्यावर पेव्हर ब्लॉक बसविणे, श्री दत्त मंदिर ते चांदणी फ्लोअर मील रस्त्यावर पेव्हर ब्लॉक बसविणे, जोगेश्वरी नगर नाल्याला संरक्षण भिंत बांधणे, शांतीनगर अंतर्गत रस्ता तयार करणे, आझाद मोहल्ला रस्ता तयार करणे, खुमाचा नाका ते मशीद रस्ता तयार करणे अशा एकूण ४१ लाख रूपयांच्या कामांचा यामध्ये समावेश आहे. या लोकार्पन व भुमीपुजन कार्यक्रामाला नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन सरपंच डॉ. मिलिंद धात्रक यांनी केले आहे.

# गुरूवर्य सुभानराव राणेंचा ४० वा पुण्यतिथी उत्सव संपन्न

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

श्रीपंत महाराज बाळेकुंद्री यांच्या अवधूत सांप्रदायाचा प्रचार व प्रसार करणारे गुरूवर्य सुभानराव तथा अण्णा राणे यांचा ४० वा पुण्यतिथी उत्सव व त्यानिमित्त आयोजित सन्मान सोहळा मंगळवारी पेझारीतील दत्त मंदिरात परमपूज्य रंजन पंतबाळेकुंद्री यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून खासदार अरविंद सावंत, राजिप सदस्या चित्राताई पाटील, सखाराम पवार, आबासाहेब कसाळे, राजेंद्र काळे, ॲड. रूची भगत, माजी सैनिक संतोष जुईकर, शंकरराव म्हात्रे, प्रकाश म्हात्रे, प्रतिष्ठानचे अध्यक्ष दिगंबर राणे, ग्रामस्थ, पंतभक्त मंडळी आदी मान्यवर उपस्थित होते.



सकाळपासूनच सहस्रतनामावली, प्रेमध्वजारोहण, महाआरती, भजन या कार्यक्रमांची रेलचेल होती. सकाळी ११ वाजता दीपप्रज्वलन व श्रीपंत महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून सन्मान सोहळ्यास प्रारंभ झाला. या सन्मान सोहळ्यात यंदाच्या वर्षी स्व. मोरेश्वर उर्फ बापू घारे व स्व. जनार्दन लक्ष्मण दळवी यांना मरण-ोत्तर सामाजिक पुरस्कार प्रदान करण्यात आला. यासह बाळासाहेब कसाळे व राजेंद्र काळे यांना अध्यात्मिक, जयकुमार पाटील, जीवीता पाटील यांना सामाजिक, प्रमोद राऊत व संजय म्हात्रे यांना उद्योजक, रूची भगत व प्रतिक जुईकर यांना स्पर्धा परीक्षा, रूद्राक्षी टेमकर जलतरणपटू, मनश्री शेडगे हॉकीपटू, शर्विका म्हात्रे बालगिर्यारोहक, संतोष जुईकर निवृत्त सैनिक यांच्यासह कोरोना योध्दे व अंत्यविधी कार्यात मदत करणारे पेझारी गावातील देवदूत यांचा गुरूवर्य सुभानराव राणे सन्मान पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. या सन्मान सोहळ्याचे सूत्रसंचालन दिनानाथ कडू यांनी केले.

दुपारी २ ते ४ यावेळेत भजनरत्न महादेवबुवा शहाबाजकर, पंडित अरूणबुवा कारेकर, सौ. साक्षी पाटील, गंधर्व कोळी यांचे सुश्राव्य भजन सादर झाले. दुपारी ४ ते ७ या वेळेत श्रीपंत बोधपीठाचा मेळावा संपन्न झाला. या मेळाव्यात भावना कडू, सरजू भगत, प्रमिला शेळके, राजश्री शेळके, स्मिता पाटील, संजय जाधव, मारूती म्हस्के यांनी श्रीपंत वाङ्‌मयातील विविध विषयांवर अभ्यासपूर्ण विवेचन केले. डॉ. संजय भगत यांनी सद्गुरू रामानंद महाराज ते गुरुवर्य सुभानराव राणे ही गुरूशिष्य परंपरा अतिशय सोप्या शब्दांत विवेचनाव्दारे समजवून सांगितली. हा सन्मान सोहळा व पुण्यतिथी उत्सव यशस्वी करण्यासाठी गुरूवर्य सुभानराव राणे प्रतिष्ठानच्या सर्व सदस्यांनी अथक परिश्रम घेतले. रात्री ८ वाजता आरती अवधूताने पुण्यतिथी उत्सवाची सांगता झाली.

## आडावळे बुद्रुक गावामध्ये ७० वर्षांची परंपरा असलेला अखंड हरिनाम सप्ताह



**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

तालुक्यातील आडावळे बुद्रुक येथील अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता नुकतीच झाली. यावेळी या सप्ताहाची परंपरा तब्बल ७० वर्षांची असल्याची माहिती येथील ग्रामस्थ हेमंत भोईटे यांनी दिली. जय हनुमान सेवा मंडळ, आडावळे खुर्द, मुरा आणि एरंडवाडीतर्फे या अखंड हरिनाम सप्ताहाचे नियमित आयोजन होत असल्याचे सांगण्यात आले.

पोलादपूर तालुक्यातील आडावळे खुर्द येथील स्वयंभू हनुमानमंदिराच्या परिसरामध्ये या अखंड हरिनाम सप्ताहाचे दरवर्षी आयोजन होत असून तपोनिधी गणेशनाथ महाराजांच्या कृपाशिर्वादाने सुरू झालेल्या या सप्ताहाचे आयोजन श्रीरामनवमी ते हनुमानजयंती या काळात जय हनुमान सेवा मंडळाकडून केले जात आहे. आडावळे खुर्द येथील ह.भ.प.कै. गोविंद भोईटे यांनी कामथी नदीच्या खोऱ्यांतील लोकवस्तीमध्ये सर्वप्रथम किर्तनसेवेची सुरूवात केली. यानंतर असंख्य किर्तनकार व प्रवचनकारांनी सप्ताहामध्ये किर्तनसेवा करून तालुक्याम ध्ये नावलौकीक केला असून दरवर्षी नवनवीन किर्तनकार या सप्ताहात सेवा देत असतात. साधारणत: ७० वर्षांहून अधिक काळापूर्वी आडावळे खुर्द येथील हनुमानाची मुर्ती जमिनीतून आढळून आल्याची वदंता आहे. यानंतर ग्रामस्थांनी आता असलेले सुसज्ज हनुमानमंदिर साकार करून अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यास सुरूवात केली. या सप्ताहकाळात आडावळे खुर्द येथील हनुमान मंदिरातून आडावळे बुद्रुक येथील मंदिरापर्यंत पालखी मिरवणूक आणली जात असून सर्व हरिभक्तांकडून या पालखी मिरवणुकीमध्ये सात्विक तसेच उत्साहपूर्वक वर्तन करून भक्तीभाव जोपासला जात आहे.

## शासन पातळीवर मासेमार समुदयासाठी प्रयत्न करण्यात यावेत : ॲड. उमेश ठाकूर

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

काँग्रेस सेवा फाऊंडेशन, रायगडचे जिल्हाध्यक्ष तथा युवक काँग्रेस महाराष्ट्र प्रदेश मा. चिटणीस ॲड. उमेश मधुकर ठाकूर यांनी राज्य सरकारकडे शासन पातळीवर मासेमार समुदयासाठी प्रयत्न करण्यात यावेत, अशी मागणी केली आहे. तशा आशयाचे निवेदन नुकताच त्यांनी रायगड जिल्हा प्रशासन यांचेकडे सादर केले आहे. तर मुख्यमंत्री कार्यालयाला ई-मेलद्वारे सदर निवेदन पाठविले आहे.

या निवेदनात त्यांनी मासेमार समुदायाचे जीवनावश्यक प्रश्न निर्देशित केले असून, त्या समस्यांच्या निराकरणासाठी शासन तथा प्रशासन पातळीवर प्रयत्न करण्याची मागणी करण्यात आली आहे. यानुसार आदिम काळापासून कोकण प्रदेशातील कोळी, आगरी तथा संबंधित समुदायाचे लोक सागरी मासेमारी करीत आहेत. मात्र २०१९च्या उत्तरार्धापासून मानवी तथा नैसर्गिक कारणांमुळे या मासेमार बांधवांवर आर्थिक संकट कोसळले आहे.

कोविड-१९ आणि त्या पार्श्वभूमीवर लावण्यात आलेली टाळेबंदी, अवकाळी पाऊस, प्रदूषण, पूर, वादळ अशी विविध नैसर्गिक संकटांमुळे मध्यम वर्ग आणि हातावरचे पोट या स्तरात मोडणारा मासेमार समुदाय आर्थिकदृष्ट्या विवंचनेत आला. सन २०२२ मध्ये यामधून कुठेतरी बाहेर पडण्यासाठी धडपड सुरू केली असतानाच, त्यांना नव्याने एका नैसर्गिक संकटाचा सामना करावा लागत आहे. हे संकट जेलिफिशचे असून, स्थानिक मासेमार समुदाय यांना 'आग्या' म्हणून संबोधितो. गेल्या काही वर्षांपासून रायगडच्या समुद्री भागात जेलिफिशचे सातत्याने आगमन होत आहे. याचा मोठ फटका मासेमार समुदायास बसत आहे.

सद्य:कालाचा आढावा द्यायचा झाल्यास, हा काल कोळंबी उपलब्धीचा असूनदेखील अलिबाग, रेवदंडा, मुरुड, एकदरा, रेवस, नवगाव, थळ, बोंडणी, सासवणे, नांदाईपाडा अशा जिल्ह्यातील विविध समुद्रकिनारी अनेक मासेमारी नकांनी आपले नांगर टाकले आहेत, असे नमूद केल्यानंतर केंद्राच्या भूमिकेवर टीका कर्नाटण मोदी सरकारच्या महनीय भूमिकेमुळे एकीकडे महागाई आपला व्याप वाढवत असतानाच दुसरीकडे या समस्येमुळे या समुदयास मोठ्या आर्थिक प्रश्नांना तोंड द्यावे लागत असल्याचे मत व्यक्त केले आहे.

तर आर्थिक विवंचनेतून आत्मघात करण्याचे प्रकार आपल्या राज्यासाठी काही नवीन नाहीत, पण अजून एक समुदयात हा अविचार रुजण्याआधी एक जबाबदार शासन तथा प्रशासन म्हणून आपण सावध होणे आणि तत्सम कृती करणे, आवश्यक असल्याचे विशद करताना समुद्री भागात मच्छीचे प्रमाण कमी होण्याची करणे, त्यावरील उपाययोजना, दरम्यानच्या, काळात जेलिफिश, देवमासा यांसारख्या जिवांच्या कोकण समुद्र पर्यावासात आगमानच्या कारणांचा शोध आदीसाठी शासकीय पा-तळीवर अभ्यासगटाहाची नियुक्ती तथा त्यांनी केलेल्या 'समुद्री पर्यावास संरक्षण योजना' विधायक पातळीवर अंमलात आणण्याची सूचना करण्यासोबतच आर्थिकदृष्ट्या विवंचनेत सापडलेल्या मासेमार समुदयास आर्थिक स्थैर्य तथा मदत देण्यासाठी पॅकेज जाहीर करणे. महत्वाचे म्हणजे ही घोषणा घोषणा ना राहता, येत्या नारळी पोर्णिमेपर्यंत जाहीर केलेली आर्थिक मदत त्यांना त्यांच्या खात्यामार्फत पोहचती करण्याची विनंती त्यांनी केली आहे.


### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे सुचित करण्यात येत आहे की, दिनांक १२/०४/२०२२ रोजी **ॲड.धिरज डाकी** यांनी त्यांचे अशिल **१) अंकुश फुलाजी घरत, २) समाधान फुलाजी घरत, ३) आनंदीबाई फुलाजी घरत, ४) कुसुम बाबुराव मुंबईकर** यांचे वतीने मौजे : हरिश्चंद्र पिंपळे, ता.उरण, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकतीची वादळवारा या वृत्तपत्रात जाहीर नोटीस प्रसिद्ध केली होती त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मौजे : हरिश्चंद्र पिंपळे, ता.उरण, जि.रायगड**

| मौजे | सर्व्हे नं./ हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| हरिश्चंद्र पिंपळे | २२/४ | १-३२-८० पो.ख. ०-०३-३० (विक्री क्षेत्र ०-२२-५० हे.आर.पॉ.) | २१.६२ |

येणेप्रमाणे सदर मिळकतीचे वर्णन आहे.

सदरहू नोटीसला आमचे अशिल **सौ.अलका राजेश ठाकूर** यांची सक्त हरकत असून सदरहू मिळकतीत आमचे अशिलांचा जन्मजात असा अविभाज्य हिस्सा आहे. सदरहू मिळकतीचे सरस निरस वाटप झाले नसून पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात **स्पे.मु.नं.९०/२०२१** न्यायप्रविष्ठ आहे. वरील मिळकत ही हिंदू एकत्रित कुटुंबांची असून तिचे वाटप झाले नाही. जर सदर मिळकतीचा कुठल्याही प्रकारचा विकसनाचा करार, पॉवर ऑफ ॲटार्नी, भाडेकरार, लीज, हस्तांतरण विक्री, दान, बक्षिस, गहाण, फरोक्तखत, सदर जागेत बांधकाम अतिक्रमण केल्यास सदरचा कोणताही व्यवहार आमचे अशिल यांचेवर बंधनकारक राहणार नाही. तसेच कोणीही तिऱ्हाईत व्यक्तीने व्यवहार केल्यास त्यास सर्वस्वी परिणामांस जबाबदार तिऱ्हाईत व्यक्ती राहणार आहे. त्याचप्रमाणे तुम्ही वरील मिळकती संदर्भात कोणताही व्यवहार केल्यास आमचे अशिल तुमच्या विरुद्ध दिवाणी व फौजदारी कारवाई करतील, याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**ॲड.सुमित अविनाश म्हात्रे**
**जय नारायण बिल्डींग, गाळा नं.४,**
**गावदेवी मंदिरासमोर, रामगणेश गडकरी मार्ग, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**



**ॲड.सागर गोंधळी**
**ॲड.राकेश दिघे**

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी क.स्तर सो.यांचे न्यायालयात
फौ.चौ.अर्ज नं.४२७/२०२२

**श्री.रवि बाबुराव चौघुले**
वय : वर्षे, व्यवसाय : नोकरी
पत्ता : रा.गिरवले, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
ग्रामसेवक / ग्रामविकास अधिकारी
ग्रुप ग्रामपंचायत गिरवले,
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, सदर अर्जदार ह्यांचा जन्म **श्री.रवि बाबुराव चौघुले** दिनांक ०१/०६/१९७२ रोजी मौजे : गिरवले, ता.पनवेल, जि.रायगड येथील राहत्या घरी जन्म झालेला आहे. सदर अर्जदार **श्री.रवि बाबुराव चौघुले** ह्यांच्या जन्माची नोंद संबंधित ग्रामसेवक / ग्रामविकास अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत गिरवले, ता.पनवेल, जि.रायगड ह्यांना योग्य तो आदेश देण्यात यावेत याकरिता अर्जदार ह्यांनी हा सदरचा अर्ज मे.कोर्टात दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जदार यांस त्यांचे मागणीप्रमाणे जन्माचा दाखला देणेस कुणाचीही हरकत असल्यास अशा इसमांनी त्याच्या लेखी हरकती जरुर कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारांस त्यांचे विनंतीप्रमाणे जन्माचा दाखला दिला जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.१६/०४/२०२२ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक फौ.न्याया, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक फौ.न्याया, पनवेल


## जिल्हा परिषदेच्या माध्यमातून राबविला शाळा पूर्व तयारी मेळावा

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमध्ये शाळा पूर्व तयारी मेळावा रायगड जिल्हा परिषद तर्फे राबविण्यात आले आहे. इयत्ता पहिली च्या विद्यार्थ्यांमध्ये शारीरिक, बौद्धिक, भाषा, गणित, सामाजिक व भावनिक क्षमतांचा विकास करणे हे या मेळाव्याचे उद्देश आहे असे सांगण्यात आले. या कार्यक्रमाला माता पालकानी व मुलांनी मोठ्या संख्येने उपस्थित दर्शविली.

कोरोनामध्ये मुले दोन वर्षे शिक्षणाच्या प्रवाहामध्ये नव्हती त्या शिक्षणाच्या प्रवाहामध्ये पहिलीच्या वर्गात आणण्यासाठी त्यांची भिती दूर करण्यासाठी तालुक्यातील वेग वेगवेगळ्या शाळांमध्ये विविध उपक्रम राबविले आहेत. शाळांमध्ये सजावट करण्यात आली होती. मुलांमध्ये उत्साह निर्माण व्हावी यासाठी मुलांची विविध वेषभूषा करून लेझीम ढोल ताशांच्या गजरात मुलांचे स्वागत करण्यात आले.

या मेळाव्याच्या माध्यमातून मुलांसोबत मातांनाही आपल्या मुलातील आकलन क्षमता, बौद्धिक क्षमता ओळखणे सोपे झाल्याचे मत माता-पालकांनी व्यक्त केले शैक्षणिक उपक्रमाचे पालकांनी कौतुक केले. या मेळाव्यासाठी शिक्षण विभागातील अधिकारी तालुक्यातील शिक्षक वर्गानी विशेष मेहनत घेतली.


**वकील : सुयोग शहाजी मोलाने**

### जाहीर नोटीस

वारसाच्या सर्टीफिकेटबद्दल वाशी येथील दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) पनवेल यांच्या न्यायालयात
अर्ज नंबर ३२७/२०२२
नि.क्र.८/ड
ने.ता.२२/०६/२०२२

**१) श्रीमती.सुमित्रा नारायण शेटीगर**
वय : ७२ वर्षे, व्यवसाय : निवृत्त
पत्ता : रुम नं.अ/१२, अर्जुन को.हौ.सो.,
प्लॉट नं.१४/सी, सेक्टर-०४, बेलपाडा,
खारघर, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२१० — अर्जदार

ज्यापेक्षा अर्जदाराचे असे म्हणणे आहे की, अर्जदार क्र.१ यांचा मुलगा, **कै.प्रकाश नारायण शेटीगर** यांचे दि.१३/०५/२००४ रोजी राहत्या घरी रुम नं.३५/१२५८, टिळक नगर, चेंबुर, मुंबई येथे निधन झाले. अर्जदार यांनी कोर्टास सदरहू मयताचे वारसदार म्हणून अर्ज केला आहे. त्याच्या मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

**अ) रुम नं.अ/१२, अर्जुन को.हौ.सो., प्लॉट नं.१४/सी, सेक्टर-०४, बेलपाडा, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६. क्षेत्रफळ ५६५ चौ.मी.**

वरील मिळकतीबाबत अर्जदाराने वारसाचा दाखला मिळविण्याबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसाच्या दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क, अधिकार हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास पनवेल येथील न्यायालयात लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत ह्या न्यायालयात दाखल करावी. वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे वारसांचा दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२०/०४/२०२२ रोजी आमच्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल


## स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव निमित्ताने २२ एप्रिल रोजी मुरुडमध्ये भव्य महाआरोग्य शिबिर

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव निमित्ताने महाराष्ट्र शासन आरोग्य विभाग यांच्या मार्फत मुरुडच्या ग्रामीण रुग्णालयात (लेडि कुलसूम बेगम) येथे शुक्रवार दि.२२ एप्रिल २०२२ रोजी सकाळी ९.०० वा.ते सायंकाळी ५.०० वा.पर्यंत भव्य महाआरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

अलिबाग -मुरुड मतदार संघाचे आमदार महेंद्रशेठ दळवी यांच्या हस्ते सदर शिबिराचे उद्घाटन करण्यात येणार असून खासदार सुनील तटकरे, रायगडच्या पालकमंत्री ना.आदिती तटकरे, आरोग्य सेवा उपसंचालक डॉ.गौरी राठोड, रायगड जिल्हा परिषदेचे मुख्याधिकारी डॉ.किरण पाटील, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सुधाकर मोरे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.सुहास माने प्रमुख मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या शिबिरामध्ये प्रामुख्याने विशेषज्ञ बालरोग तज्ञ, स्त्रीरोग तज्ञ, अस्थिरोग तज्ञ, एम.डी.मेडिसीन (भिषक) गरोदर स्त्रियांची तपासणी विविध आजारांवर निदान, कुष्ठरोग, त्वचारोग, हाडाचे आजार, क्षय (टि.बी.), सांधेदुखी, मणक्यांचे आजार, पोटाचे विकार, किडनी विकार यात शरीरावर सुज येणे, मुतखडा, हृदयरोग, दंत विकार याबरोबरच लहान मुलांचे आजार आदी. बहुसंख्य आजारांवर तज्ञ डॉक्टरांकडून तपासणी करून त्यावर मोफत औषधोपचार मिळणार आहेत. तरी मुरुड शहरासह तालुक्यातील आजुबाजूच्या परिसरातील लोकांनी या भव्य महाआरोग्य शिबिराचा लाभ घ्यावा. असे आवाहन ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.विक्रमजित पडोळे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.संजीव दुबे,वैद्यकीय अधिकारी डॉ.विजय हाडबे,व वैद्यकीय अधिकारी डॉ.अमित मोरे यांनी केले आहे.


मा.न्या.मुजावर साहेब ह्यांचे न्यायालयात
वारसांचे सर्टीफिकेटबद्दल जाहीरनामा — दिवाणी अ.१५० रा.
प्रोसेस जमा रु.५०/- — Civ. A 150 m
**अर्जदार यांचे वकील : ॲड.केशवन रविंद्रन**

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायालय (व.स्तर) यांचे न्यायालयात पनवेल
चौकशी अर्ज क्रं.३४०/२०२२
नि.क्र.८/ड
ने.ता.२८/०४/२०२२

**१) श्रीमती.पार्वती के नायर**
वय : ८२ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
**२) श्री.राजक्रिश्नन नायर**
वय : ६३ वर्षे, व्यवसाय : नोकरी
**३) श्रीमती.गिरीजा एन नायर**
वय : ६१ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
क्रं.१ व ३ रा.फ्लॅट क्रं.३०२, ३ रा मजला,
वर्धमान प्लाझा को.ऑ.हौ.सो.लि.,
प्लॉट क्रं.४४, सेक्टर २०, कळंबोली
क्रं.२ रा एन एल/६/११/०१ श्रेयश अपार्टमेंट,
सेक्टर १५, नेरुळ ईस्ट, नवी मुंबई — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

वरील अर्जदार क्रं.१ यांचे पती व क्रं.२ व ३ यांचे वडील **कै.कन्ननकुटी किटूनी नायर** यांचे दिनांक ३१/०१/२०२० रोजी मौजे : पनवेल येथे निधन झाले. मयत **कै.कन्ननकुटी किटूनी नायर** यांच्या मालकीचे असलेले मिळकतीचे वर्णन खालीलपमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**फ्लॅट क्रं.३०२, ३ रा मजला,**
**वर्धमान प्लाझा को.ऑ.हौ.सो.लि.,**
**प्लॉट क्रं.४४, सेक्टर २०, कळंबोली**

वरील मिळकतीबाबत अर्जदाराने वारस दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसांचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क, अधिकार, हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात दाखल करावी.

वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या विनंती प्रमाणे वारस दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१८/०४/२०२२ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल



मे.सोनावणे साहेब कोर्ट
**अर्जदाराचे वकील**
**ॲड.मेहबुब गै. पटेल**

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर याचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्रं.५६६/२०२२
नि.क्र.८/ड
ने.ता.३०/०६/२०२२

**१) श्री.राजीव धिरेंद्र देसाई**
वय : २७ वर्षे, धंदा : व्यवसाय
**२) श्रीमती.प्रफुल्ला धिरेंद्र देसाई**
वय : ७५ वर्षे, धंदा : गृहिणी
दोघेही रा.पोस्ट ऑफिस १०५-ए,
लाला लजपतराय रोड, फ्लॅट नं.२०२,
गोविंद कुंज, विलेपार्ले पश्चिम, मुंबई-४०००५६ — अर्जदार

या जाहीर नोटीसीद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, अर्जदार नं.२ यांचे पती व नं.१ यांचे वडील **कै.धिरेंद्र नवनीतलाल देसाई** हे दि.२५/१२/२००७ रोजी मयत झाले असून **कै.धिरेंद्र नवनीतलाल देसाई** यांच्या नावांने सामाईकांत मौजे : पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथे पनवेल महानगरपालिका हद्दीत खालील वर्णनाचा गाळा / शॉप असून सदर गाळा / शॉपचे **कै.धिरेंद्र नवनीतलाल देसाई** हे रितसर मालक आहेत.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**
**गाळा क्र.२१, तळमजला, हायपॉईंट को.ऑप.हौ.सोसा., टाईप फेज-२, प्लॉट नं.२१२, विश्राळी नाका, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**
**क्षेत्र २२.०३ चौ.फूट कारपेट एरिया**

येणेप्रमाणे शॉप / गाळ्याचे वर्णन असून, सदरहू गाळा / शॉपच्या अनुषंगाने **कै.धिरेंद्र नवनीतलाल देसाई** यांचा वारस दाखला मिळणेकरिता अर्जदार यांनी या मे.कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

वरील अर्जदार हे **कै.धिरेंद्र नवनीतलाल देसाई** यांचे कायदेशीर वारसदार आहेत असे अर्जदारांचे म्हणणे आहे. अर्जदारांचे हक्काबद्दल कोणासही हरकत घ्यावयाची असल्यास अथवा वारसदाखला देण्यास कोणतीही हरकत असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून १ महिन्याचे आत या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकत घेण्याची आहे. जर या कालावधीमध्ये कोणीही योग्य हरकती घेतल्या नाहीत तर मे.कोर्ट अर्जदार यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि अर्जदार जर **कै.धिरेंद्र नवनीतलाल देसाई** यांचे वारसपत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.२०/०४/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व मे.कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

# संक्षिप्त...

## जर्मन रायडर्स संघ चषकांचे प्रथम मानकरी ; उपविजेता नंदा हरेश गावंड स्पोर्ट्स आरिना संघ

**दै.रायगड नगरी । माथेरान**

जय वीर हनुमान मित्र मंडळ आयोजित प्रीमियर लीग मोठ्या उत्साहात संपन्न झाला. मिरारोड शहरातील पेणकर पाडा जयवीर हनुमान मित्र मंडळाची मानली जाणारी प्रिमियर लीग मोठ्या उत्साहात संपन्न झाली.गेली दोन वर्ष सातत्याने भव्यदिव्य अंडरआर्म बॉक्स प्रीमियर लीगची स्पर्धा पेणकर पाड्यात बॉक्स क्रिकेट सामने खेळवले जातात.

तृतीय वर्षांचे आयोजन वैकुंठ धाम मैदान राजीव नगर पेणकर येथे दोन दिवसीय स्पर्धा खेळवण्यात आले असून त्यांचा शुभारंभ माजी नगरसेविका मंदाकिनी, गावंड, माजी नगरसेवक आत्माराम गावंड, सभापती अनिता पाटील, नगरसेवक मोहन म्हात्रे, आमदार गीता जैन, शिवसेना महिला उपशहर संघटक रिया म्हात्रे, हनुमान मित्र मंडळाचे अध्यक्ष दिपेश गावंड व अन्य पदाधिकारी क्रिकेट संघाच्या उपस्थित करण्यात आला.विविध क्षेत्रातील मान्यवरांनी स्पर्धेदरम्यान सदिच्छा भेटी दिल्या यावेळी आयोजकांच्या वतीने सन्मानचिन्ह देऊन उपस्थित मान्यवरांचे सत्कार करण्यात आले.

जयवीर हनुमान मित्र मंडळ पेणकर पाडा अंडरआर्म बॉक्स प्रीमियर लीग नोंदणीकृत १० नामवंत संघांनी क्रिकेट स्पर्धेला सहभाग नोंदविला होता यामध्ये विजेता संघ जर्मन रायडर्स संघ, उपविजेता हरेश नंदा गावंड स्पोर्ट्स आरिना संघ यांनी २०२२ या चषकावर नाव कोरले, तसेच जर्मन रायडर्स संघाचा सागर चव्हाण यांनी उत्कृष्ट फलंदाज तर नंदा गावंड स्पोर्ट्स आरिना संघाचा श्रीहरी देसाई यांनी उत्कृष्ट गोलंदाज किताब पटकावला,

अंतिम फेरीत विजेता उपविजेता अशा कामगिरीबद्दल त्यांच्या खेळाचा गौरव म्हणून आकर्षक पदक देऊन तसेच सहभागी झालेल्या १० क्रिकेट संघाना सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले, संपूर्ण सामन्याचे सुंदर असे समालोचन विवेक तुरे ,बाजीराव दोंद, दिपेश गावंड, पियुष गावंड यांनी करून खेळाडूना प्रोत्साहित केले तर स्पर्धे चे आयोजन नियोजनमध्ये स्पर्धा यशस्वी करण्यासाठी जयवीर हनुमान मित्र मंडळ पदाधिकारी सदस्यांनी प्रचंड मेहनत घेतली.


### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# हेरिटेज कपाडिया मार्केटला भंगाराचे गोडाऊन बनवू नका : निखिल शिंदे

**दै.रायगड नगरी । माथेरान**

सन १९१९ मध्ये स्व. रतनबाई पेस्तनजी यांच्या स्मरणार्थ उभारलेले कापडिया मार्केट त्याकाळी त्यांच्या नातेवाईकांनी स्वखर्चाने बांधून नगरपरिषदेकडे लोकार्पण केले होते.

या मार्केट मध्ये स्थानिकांना रोजगाराच्या सुविधा उपलब्ध व्हाव्यात या सेवाभावी विचाराने याठिकाणी अनेक गाळे व्यवसायासाठी बांधण्यात आले होते त्यातील कित्येक गाळे आजही बंद अवस्थेत आहेत. नुकताच या भव्य मार्केटच्या सुशिभिकरणासाठी नगरपरिषदेच्या माध्यमातून जवळपास पाऊण कोटी रुपये खर्च करून त्याचे नूतनीकरण करण्यासाठी संबंधीत ठेकेदारांमार्फत कामे सुरू झाली होती परंतु तीन वर्षांपासून या मार्केटची कामे आजही अपूर्णावस्थेत आहेत.

माथेरान मधील एक ब्रिटीश कालीन सुंदर ठेवा असणाऱ्या मुख्य बाजारपेठेतील कापडिया मार्केट या हेरिटेज वास्तूला एवढ्या मोठ्या प्रमाणावर खर्च करण्यात येत आहे परंतु तेथील बंद गाळ्यांना एकप्रकारे भंगाराचे गोडाऊन बनवले जात आहे हे आतातरी नगरपरिषदेच्या अधिकाऱ्यांनी थांबवावे आणि जे खरोखरच गरजवंत, सुशिक्षित बेरोजगार आहेत अशांना ह्या गाळ्यांचा उपयोग स्वयंरोजगार करीता देण्यात यावा अशी मागणी येथील सामाजिक कार्यकर्ते निखिल शिंदे यांनी केली आहे.

माथेरानच्या मध्यवर्ती भागात हे आकर्षक हेरिटेज मार्केट लोकांना रोजगार निर्मिती होण्यासाठी त्याकाळी स्व. रतनबाई पेस्तनजी यांच्या स्मरणार्थ बांधून दिले होते. दानशूर व्यक्तीनी ही



अमूल्य भेट मोफत दिलेली असताना त्या वास्तूची सुयोग्य प्रकारे निगराणी आणि स्वच्छता राखणे हे या मार्केट मधील गाळ्यांचा उपभोग घेणाऱ्या व्यावसायिकांचे सुद्धा कर्तव्य आणि जबाबदारी आहे. परंतु अनेकदा येथील काही ठिकाणी तर दुर्गंधीयुक्त कचऱ्याचे साम्राज्य नेहमीच पर्यटकांच्या निदर्शनास येते त्यामुळे सहसा या हेरीटेज वास्तूला पाहण्याची इच्छा असताना देखील पर्यटकांना या ठिकाणी जाऊन या सुंदर वास्तूचा अभ्यास,निरीक्षण करता येत नाही.

लाखो रुपये खर्च करून कपाडिया मार्केट मधील गाळे शेवटची कात टाकत आहेत. कपाडिया मार्केटचे गाळे अतिक्रमणाच्या विळख्यात सापडलेले असून मार्केटला जे काही भंगाराच्या गोदामाचे स्वरूप प्राप्त होत चालले आहे याला सर्वस्वी जबाबदार कोण ? तत्कालीन लोकप्रतिनिधी की नगरपरिषदेचे अधिकारी वर्ग आहेत. अजूनही या ठिकाणी कामे अपूर्णावस्थेत आहेत संबंधित ठेकेदाराने ही कामे का अपूर्ण ठेवली आहेत त्यामुळे या सुंदर वास्तूला एकप्रकारे बकालपणा येण्याची शक्यता नाकारता येत नाही तरी लवकरात लवकर येथील गाळ्यांची गोडाऊन होण्यापूर्वी नगरपरिषदेच्या अधिकाऱ्यांनी ताबडतोब कार्यवाही करावी असेही निखिल शिंदेंनी सांगितले आहे.

> माथेरान नगरपरिषदेच्या अखत्यारीत असलेल्या कापडिया मार्केट या हेरीटेज वास्तूच्या नूतनिकरणासाठी जवळपास ७५ लक्ष रुपये खर्चाची निविदा काढली होती.परंतु या ठिकाणी असलेल्या सब ठेकेदारांनी जी कामे निविदेत नमुद नाहीत ती करण्यावरच अधिक भर दिला होता. ठेकेदाराने अतिशय निकृष्ठ आणि नियोजन शून्य कामे केलेली आहेत.यामध्ये ड्रेनेज लाईन, छतावरील पत्रे, त्याचप्रमाणे भेसळयुक्त रंगकाम, पत्र्याची व्यवस्थित मार्जिन न केल्याने मागील तीन वर्षांपासून ही कामे अद्यापही पूर्ण झालेली नाहीत याबाबतीत आम्ही वेळोवेळी सदर निकृष्ठ दर्जाच्या कामाबद्दल नगरपरिषदेच्या कार्यालयात लेखी पत्रव्यवहार केलेला आहे.
>
> **शिवाजी शिंदे, माजी नगरसेवक,**
> **विरोधी पक्षनेते माथेरान नगरपरिषद**

# महाराष्ट्र शासन आरोग्य विभागाच्या वतीने उपजिल्हा रुग्णालयात आयुष्मान मेळा संपन्न

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

उपजिल्हा रुग्णालय श्रीवर्धन येथे आझादी का अमृतोत्सव कार्यक्रम अंतर्गत केंद्र शासनाच्या सूचनेनुसार राज्य शासनाच्या आरोग्य विभागाकडून आयुष्मान मेळाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाला श्रीवर्धनचे तहसीलदार सचिन गोसावी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते तर अध्यक्षस्थानी रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ मधुकर ढवळे होते. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून मार्गदर्शन करताना तहसीलदार सचिन गोसावी म्हणाले की, आयोजित केलेल्या आयुष्मान मेळ्यात सर्व आजारावरचे तज्ञ आज उपस्थित असून जास्तीत जास्त जनतेला या मेळ्याच्या माध्यमातुन फायदा व्हावा या हेतूने मेळ्याबाबत आधीच जनजागृती केलेली आहे.



मेळ्याला उपस्थिती मोठ्या प्रमाणात लाभलेली असून लाभार्थ्यांनी घाई गडबड न करता आपल्या आरोग्याविषयी शंकांचे समाधान करून घ्यावे तसेच उपचार घ्यावे. मेळ्याला आलेल्या प्रत्येकाने आपल्या आरोग्याविषयी जागरूकता ठेवण्यासाठी लाभ घ्यावा असे सांगितले. या वेळी व्यासपीठावर डॉ मधुकर ढवळे डॉ.सूरज तडवी, डॉ.महेंद्र भरणे, डॉ.सुभाष सिंग, डॉ.तुषार शेठ, डॉ प्रफुल्ल, डॉ अलंकार करंबे, डॉ डोईफोडे, डॉ सोनाली करंबे, डॉ.नाडकर ,आदी मान्यवर उपस्थित होते. अध्यक्ष स्थानांवरून मार्गदर्शन करताना डॉ ढवळे म्हणाले की, शासनाच्या वतीने जनतेच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी या आयुष्मान मेळ्याचे आयोजन केलेले आहे. आपले आरोग्य प्रत्येकाने जपले तर देश बलवान राहील असे सांगितले.

मेळ्यात कान, नाक, घसा, पोटाचे विकार, लहान मुलांचे आजार, मुतखडा, हाडाचे हाडांचे आजार, स्त्रीयांचे आजार, डोळ्यांचे विकार, हृदय रोग, दातांचे विकार, किडनी आजार या विषयी तपासणी करून प्राथमिक उपचार करण्यात आले. तसेच महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना, आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना बाबत माहिती देण्यात आली. या दोन्ही योजनेचे महत्व पटवून देण्यात आले व या योजनेचा लाभार्थ्यांनी लाभ कसा घ्यावा या बाबत मार्गदर्शन करण्यात आले.

# महाराष्ट्र ग्राम सामाजिक परिवर्तन अभियानांतर्गत वडगाव येथे जनजागृती कार्यशाळा संपन्न

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव अंतर्गत महाराष्ट्र ग्राम सामाजिक परिवर्तन अभियान व ग्रामपंचायत वडगाव यांच्या माध्यमातून वडगाव येथे कोरोना मुक्त गाव लोकजागर आरोग्याचा हर घर दस्तक या विषयांवरील जनजागृती कार्यशाळा घेण्यात आली.

यावेळी महाराष्ट्र ग्राम सामाजिक परिवर्तन अभियानाची ओळख व आरोग्याचे महत्व तसेच जागर आरोग्याचा उपक्रमाचे आयोजन याबद्दल सविस्तर माहिती देऊन गृह भेटीच्या माध्यमातून नागरिकांमध्ये जाणीव जागृती होण्यासाठी त्यांना विविध योजनांची माहिती देण्यात आली.

आरोग्य सेविका श्रीमती लांगे यांनी कीटकजन्य आजार व जलजन्य आजार याविषयी सविस्तर माहिती दिली. त्यांनी सर्वांना स्वत:चे आरोग्य सुदृढ ठेवण्याकरिता आवाहन केले. आरोग्य सेविका श्रीमती चव्हाण यांनी इतर आजार व करोना लसीकरण याविषयी सविस्तर माहिती दिली तसेच करोनाच्या संभाव्य ४थ्या लाटेविषयी सविस्तर माहिती दिली. यावेळी सरपंच शिवाजी गावडे, ग्रामसेविका श्रीमती लवटे, आरोग्यसेविका श्रीमती चव्हाण, श्रीमती लांगे, माणगाव तालुका समन्वयक दत्तात्रय गायकवाड व ग्रामस्थांची उपस्थिती होती.




# नागोठण्याची ग्रामदेवता श्री जोगेश्वरी मातेचा पालखी सोहळा उत्साहात संपन्न

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

नागोठण्याची आराध्य ग्रामदेवता श्री जोगेश्वरी माता व श्री भैरवनाथ महाराजांचा रविवारी (दि.१७)सकाळी दहा वाजता मोठ्या उत्साहात सुरु झालेला चैत्र पालखी सोहळा चौथ्या दिवशी बुधवारी (दि. २०) दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास पालखी मंदिरात पोहोचल्यानंतर सुमारे ७५ तासांनंतर निर्विघ्नपणे पूर्ण झाला.

नाागोठण्याची ग्रामदेवता श्री जोगेश्वरी माता व श्री भैरवनाथ महाराजांची पालखी ग्रामस्थांना दर्शनासाठी नागोठण्यातील सर्व भागांत नेण्यात आली. सर्वच ठिकाणी ग्रामस्थांनी तसेच तरूण-तरूणी, महिला व आबाल वृध्दांनी पालखीचे वाजत-गाजत- नाचत उत्साहात स्वागत केले. या पालखी सोहळ्या निमित्ताने नागोठण्यातील परंतु नोकरी, व्यवसाया निमित्ताने गावाबाहेर असलेले चाकरमानी, ग्रामस्थ आणि माहेरवाशिणी गावात आवर्जून परतल्या होत्या. जोगेश्वरी मातेच्या या पालखी सोहळ्याच्या



निमित्ताने ग्रामस्थांना घरोघरी मातेचे दर्शन होणार असल्याने मातेच्या स्वागतासाठी सर्वत्र आकर्षक सजावटी, विद्युत रोषणाई, तसेच स्वागतकमानी उभारण्यात आल्या होत्या. त्यामुळे संपूर्ण गावात एक आनंदाचे, उत्साहाचे व भक्तीमय वातावरण निर्माण झाले होते.

हा पालखी सोहळा निर्विघ्नपणे यशस्वी होण्यासाठी जोगेश्वरी माता विश्वस्त समितीचे अध्यक्ष नरेंद्र जैन, सचिव भाई टके, उत्सव समितीचे अध्यक्ष नितीन राऊत, उपाध्यक्ष रुपेश नागोठणेकर, सचिव मंगेश कामथे, सहसचिवपदी संजय नांगरे, खजिनदार प्रथमेश काळे, सहखजिनदार सुदर्शन कोटकर आदींसह विश्वस्त समिती व उत्सव समितीचे सर्व पदाधिकारी, सदस्य व ग्रामस्थ यांनी मेहनत घेतली. पालखी मंदिरात पोचल्यानंतर ग्रामदेवतेच्या पालखीला सहकार्य करणाऱ्या सर्वांचे उत्सव समितीच्या वतीने आभार मानण्यात आले.

# नगर पंचायतीच्या वतीने नगरीतील रायगड भूषण व्यक्तींचा नगराध्यक्षांचे हस्ते सन्मान



**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

मंगळवार दि. १९ एप्रिल रोजी सकाळी नगरपंचायतीच्या झालेल्या सर्वसाधारण सभेच्या औचित्याने सकाळी ११.०० वाजता समस्त माणगांवकरांचे वतिने नगरीतील रायगड भूषण सन २०२०-२१ पुरस्कार प्राप्त व्यक्तींचा नगराध्यक्ष ज्ञानदेव पोवार, उप नगराध्यक्ष सचिन बोंबले यांच्या शुभहस्ते तसेच नगरीचे मुख्याधिकारी राहुल इंगळे यांच्या प्रमुख उपस्थितीत सन्मान करण्यत आला.

या प्रसंगी पाणी पुरवठा सभापती राजेश मेहता, स्वच्छता व आरोग्य सभापती अजित तार्लेकर, शिक्षण बालकल्याण सभापती शर्मिला सुर्वे व सर्वपक्षिय नगर सेवक, नगरसेविका तसेच माजी नगराध्यक्ष विद्यमान सदस्य आनंद यादव कनिष्ठ अभियंता आकाश बुवा व नगर पंचायतीचे कर्मचारी रामदास पवार, मंगेश पाटील, सुनिल पारखे यांच्या उपस्थितीत माणगांव नगरीतील रायगड भूषण सन २०२०-२१ पुरस्कार विजेते जेष्ठ समाजसेवक संजय अण्णा साबळे, जेष्ठ पत्रकार व्यंगचित्रकार रविंद्र कुवेसकर, नृत्य कलावंत काजोल पाखुर्डे, शिक्षक दिलीप उभारे यांचा यथोचित सन्मान करण्यात आला.

शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व स्मृतीचिन्ह भेटवस्तु देऊन त्यांचा आदरपूर्वक सन्मान केला. या प्रसंगी सत्कार मुर्तिंनी नगर पंचायती च्या सर्व मान्यवरांचे आभार व्यक्त केले व माणगांवकरांना धन्यवाद दिले आहेत.

# बेस्ट परफॉर्मन्स किताब मिळवून महाराष्ट्राची वाढविली शान

**दै.रायगड नगरी । उरण**

कर्नाटक येथे ९ ते ११ एप्रिल २०२२ मध्ये साजरा झालेल्या लोककला महोत्सव-२२ मध्ये पुन्हा एकदा बेस्ट परफॉर्मन्सहा प्रथम क्रमांकाचा किताब मिळवून हॅटट्रिक साधून दत्ता भोईर आणि त्यांच्या समुहाने महाराष्ट्र राज्याचे नाव उज्वल केले असल्याने सर्व स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. भेंडखळ गावाचे सुपुत्र दत्ता भोईर आणि त्यांच्या कलाकार समूहांला या मोहोत्स्वात कोळी व लावणी ही लोककला सादरकरण्या साठी महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व करण्याची संधी देण्यात आली होती.या स्पर्धेत संपूर्ण देशांतून २५ राज्यांनी सहभाग घेतला होता.



कर्नाटक उडपी येथे दक्षीण कन्नडा मोगवीरा महासंघ उडपी यांच्या वतीने महालक्ष्मी उत्सव इंटर झोनल लोककला मोह्त्स्व-२०२२ आयोजित करण्यात आला होता.अखंड भारता मधून २५ राज्यानी या महोत्सवात सहभाग घेतला होता.महाराष्ट्राच्या वतीने नाखवा माझा दर्याचा राजा या कार्यकमांतर्गत कोळी व लावणी नृत्यांचे सादरीकरण करण्यात आले होते. बेस्ट परफॉर्मन्सहा प्रथम क्रमांकाचा किताब नाखवा माझा दर्याचा समुहाने मिळवून हॅटट्रिक साधली आहे. महोत्सवाच्या अंतिम दिवशी या कार्यक्रमाच्या समारोहा साठी कर्नाटकाचे मुख्यमंत्री बसराज बोम्मई उपस्थित होते.याप्रसंगी आपले मार्गदर्शनपर विचार मांडताना कर्नाटकाचे मुख्यमंत्री बसराज बोम्मई म्हणाले २५ राज्यांनी आपआपली पारंपारिक लोककला सदार केल्या परंतु , सदार करणाऱ्या कलाकारांनी आपापल्यापरीने सुंदर अविष्कार सदर केले असले तरी महाराष्ट्राने सदर केलेले कोळी व लावणी नृत्याविष्कार हा या महोत्सवातील बेस्ट परफॉर्मन्स ठरला असल्याने मी त्यांसमुहाचे सर्वप्रथम कौतुक करून त्यांना शुभेच्छादेतो.ते कर्नाटक उडपी येथे दक्षीण कन्नडा मोगवीरा महासंघ उडपी यांच्या वतीने महालक्ष्मी उत्सव इंटर झोनल लोककला मोह्त्स्व-२०२२ आयोजित प्रसंगी आपलेमार्गदर्शन पर विचार मांडताना म्हणाले.

मुख्यमंत्री बोम्मई पुढे म्हणाले विणकर आणि मच्छीमार कुटुंबांतील मुलांसाठी रेठा विद्या निधी शिष्यवृत्ती योजनेला या वर्षी मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. त्याच बरोबरीने राजीव गांधी गृहनिर्माण योजने अंतर्गत मच्छीमारांसाठी ५ हजार बांधण्यात येणार असल्याचे सांगून मच्छीमार बांधवांसाठी १०० मासेमारी नौका ही देण्यात येणार असल्याची घोषणा त्यांनी यावेळी उडपी-उचीला येथील महालक्ष्मी मंदिरात लोककला महोत्सवा निमित्त आयोजित समारोह प्रसंगी केली.

या व्यतिरिक्त मासेमारीच्या सुविधा सुधाराण्यासाठी आठ बंदरां निर्जंतुकीकरण कर्णाचे काम लवकरचहाती घेतात येणार असल्याचेही ते म्हणाले. महिलांचे ही सक्षमीकरण हे राज्याचे उद्दिष्ट पूर्ण करण्या साठी एक अँकर बँक महिला बचत गटाशी जोडली जाईल व राज्य सरकारचे हे उद्दिष्ट पूर्णकरण्या साठी १.५ लाखरु रु. पर्यंत कर्ज दिले जाणार असल्याची सरकारची भूमिकाही त्यांनी यावेळी स्पष्ट केली.समारोहाच्या शेवटी विजेत्या समूहाला सन्मानित करण्यात आले.

# मंगळसूत्र खेचून चोरट्यांचे पलायन ; महिलांमध्ये भीतीचे वातावरण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खारघर मध्ये सकाळी फेरफटका मारण्यासाठी घराबाहेर पडलेल्या साठ वर्षीय महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र आणि सोनसाखळी खेचून चोरट्यांनी पळ काढल्याने महिला वर्गात भीतीचे वातावरण पसरले आहे.

खारघर सेक्टर-१८ मध्ये राहणाऱ्या शोभा प्रेमराज राऊत (वय ६०) या नेहमीप्रमाणे फेरफटका मारण्यासाठी घराबाहेर पडल्यानंतर खारघर सेक्टर १८ मधील मैदान आणि माऊली सोसायटी लगतच्या रस्त्यावर समोरुन आलेल्या महिलेशी संवाद साधत असताना मोटाररुन आलेल्या चोरट्यांनी त्यांच्या गळ्यातील मंगळसूत्र आणि सोनसाखळी खेचून पळ काढल्याने महिलांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

विशेषतः सकाळी पोलिसांची गस्त नसते. तसेच रस्त्यावर वर्दळ कमी असल्याचा फायदा चोरटे घेत आहेत.

या चोरी प्रकरणी शोभा राऊत यांनी खारघर पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल केला आहे. त्यानंतर पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही मधील फुटेज घेवून तपास सुरु केला आहे.